## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार**
**क्र. रामाआ/तक्रार/१०४/२०२४/जळगाव**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.भुषण अशोक पवार,<br>रा.मु.पो.करगाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव-४२४११९. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, करगाव,<br>ता.चाळीसगाव, जि.जळगाव. |

**सुनावणी दिनांक-१५/०७/२०२५**

तक्रारदार यांनी दि.१२/०२/२०२४ रोजीच्या अर्जान्वये "अर्ज सादर करुन विहित मुदतीत माहिती न मिळणे किंवा कोणताही प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांच्याकडून न मिळणे, अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसांच्या विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार दंड व कलम २०(२) नुसार शास्ती ची कारवाही करावी. सोबतच मला झालेल्या शारीरिक व मानसिक त्रासापोटी मला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(८)(ख) नुसार रुपये १०,०००(दहा हजार रुपये) नुकसान भरपाई देण्यात यावी." असे कारणे नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सुनावणीसाठी – तक्रारदार उपस्थित असून संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी दि.१८/११/२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"मौजे करगांव, ग्रामपंचायतच्या वतीने सन २०२० ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या ठरावांच्या साक्षांकित प्रती तसेच सन २०२० ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत झालेल्या लेखा परिक्षणाच्या अहवाल प्रती लेखी स्वरुपात प्राप्त व्हाव्या."

४. तक्रारदार यांनी माहिती न मिळाल्याने दि.१९/१२/२०२३ रोजी प्रथम अपिल अधिकारी तथा सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगांव, जि.जळगाव, यांचेकडे माहिती मिळण्यासाठी प्रथम अपिल दाखल केले असून त्यामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगांव, जि.जळगाव, यांनी दि.०३/०१/२०२४ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये श्रीमती.अर्चना कच्छवा, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत करगाव, यांनी अर्जदार यांच्या माहिती अधिकार अर्जात मागणी केलेली माहिती सदर आदेश प्राप्त दिनांकापासून १० दिवसांत परस्पर टपालाद्वारे विनामुल्य देण्यात यावी असे आदेश पारित केल्याचे दिसून येते.

५. सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, करगाव, ता.चाळीसगाव, जि.जळगांव. यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८/११/२०२३ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन तसेच प्रथम अपिल अधिकारी तथा सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगाव, जि.जळगाव, यांनी दि.०३/०१/२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार तक्रारदार यांना कोणतीही माहिती अथवा उत्तर दिले असल्याचे दिसून येत नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, करगाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव. यांनी तक्रारदार यांना माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत थेट तक्रारीमध्ये खालील नमुद मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे माहिती देण्याचे आदेश पारीत करता येणार नाही.

In the case of Chief Information Commissioner –Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section १८ of the Right to Information Act, २००५, could not be treated as appeal under Section १९ and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section १८ of the said Act has no jurisdication to pass an order providing for access to information.

उपरोक्त सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर तक्रारीत माहिती देण्याचे आदेश पारीत होत नाही. त्यामुळे तक्रारकर्ता यांना माहिती देण्याची विनंती मान्य करता येत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, करगाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव, यांनी पारित केलेल्या दि.०३/०१/२०२४ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, करगाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव. यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील आदेशासह प्रस्तुतची तक्रार क्र.१०४/२०२४/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ६०९३ 08 SEP 2025